# <u>नुतणीकरण प्रमाणपत्र</u>

<u>वाचा :-</u>

१. मुख्याध्यापक **डॉ. विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल, आर्वी रोड लातूर ता.जि. लातूर**यांचा प्रस्ताव **दि. ०३/०६/२०२२**

२. मुख्याध्यापकयांनी यापुर्वी दिलेली मान्यता, परिशिष्ट-२, तपासणी अहवाल व इतर पुरावे सादर केलेली आहेत.

३. गटशिक्षणाधिकरी यांचा तपासणी अहवाल

४. या कार्यालयाची मान्य टिपणी दिनांक ०३/०२/२०२३

---

| | | |
|---|---|---|
| **ग्राम** | :- | **आर्वी रोड लातूर ता.जि. लातूर** |
| **दुरध्वनी (संस्थेचा / शाळेचा)** | :- | - |
| **ईमेल (संस्थेचा / शाळेचा)** | :- | - |
| **जावक क्र.** | :- | **क्र./जिपला/शिविप्रा/कार्या- १२/सीआर-** 5896 **जि.प.लातूर दि.** 03/02/2023 |
| **जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,** | :- | **जिल्हा परिषद, लातूर** |
| **(जिल्हा / राज्य यांचेनाव )** | :- | **महाराष्ट्र.** |
| **क्रमांक** | :- | **२७२८०१०५२१८** |
| **व्यवस्थापक (संस्थेचे नाव)** | :- | **महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशनल रिसर्च एस.नं. १२३/१२४ दौंड रोड, कोथरुड, पुणे** |

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत..**

आपला दिनांक **०३/०६/२०२२** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार /शाळेची केलेलीतपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद लातूर, **दिनांक ०१/०४/२०२२** पासून दि. **३१/०३/२०२५** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता **१ ली ते ८ वी** करीता **डॉ. विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल, आर्वी रोड लातूर ता.जि. लातूर** या शाळेस तात्पुरती देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे :-**

१. मान्यतेचाकालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नाता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधीलतरतुदीचे शाळा पालन करील.

३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहील्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्यांच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्वी मिळेल, अशी परीपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येतील.

५. संस्था / शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाणणी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्णहोईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्णहोईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उतीर्णहोण आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदिनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान ०५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.